5रु. कोर्ट फी Rs.5 COURT भारत INDIA पाँच रुपये FIVE RUPEES

(20)

# विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर गंगाखेड यांचे न्यायालयात

Ex. 62

दिवाणी दावा क्रमांक 318/2025

अंगद

**विरुध्द**

तहसिलदार व इतर

वाद : जाहिर करणे व मनाई हुकुम.

ORDER
O.S. to Say.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.21 12:46:19 +0530

CJSD, Gangakhed.

**महोदय,**

वादी खालील प्रमाणे वादपत्र दुरुस्ती बाबत दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत अर्ज सादर करीत आहे.

1] हे की, वादीने प्रस्तुत दिवाणी दावा दाखल केला असून सदर दावा प्रलंबित आहे.

2] हे की, प्रस्तुत प्रकरणात दावा दुरुस्ती नुसार मुळ दाव्यातील मजकुराबाबत कुठलीही विसंगती होत नसून प्रस्तावित दावा दुरुस्ती मुळ दाव्याच्या सुसंगत असुन सदर दावा दुरुस्ती करणे न्यायोचित ठरणार आहे. या करिता प्रस्तुत दाव्यात दावा दुरुस्ती पुढील प्रमाणे करण्यात यावी.

3] हे की, प्रस्तुत दाव्यातील परिच्छेद क्र.6 नंतर परिच्छेद क्र.6-अ पुढील प्रमाणे दुरुस्त करण्यात यावा.

6-अ] हे की, वादीच्या मालकीचे शेत गट क्र.255/1 एकुण क्षेत्रफळ 52 आर पोटखराब 5 आर असे एकुण 57 आर या क्षेत्रफळाच्या बाबत प्रतिवादींनी वादीचे वडिल

यांनी 01 आर क्षेत्र याबाबत दानपत्र करुन दिल्याचे निवेदन केलेले आहे. वादीच्या वडिलांनी कधीही दानपत्र करुन दिलेले नाही. सदर तथाकथित दानपत्र पुर्णपणे खोटे व बनावटी असून सदर दानपत्र हे वैध होत नाही. वादी किंवा वादीचे वडिल सदर मालमत्तेचे मालक असून दानपत्राद्वारे मालमत्ता हस्तांतरण होवू शकत नाही. सदर तथाकथित दानपत्र अनोंदणीकृत असून भारतीय नोंदणी कायद्यानुसार अवैध दस्त आहे. तसेच सदर दानपत्राबाबत योग्य मुद्रांकही दिलेला नसून सदर दानपत्राआधारे वादीचा मालकी व ताबा घेणे हे देखील अवैध असुन याबाबत प्रतिवादींनी पुर्णपणे बनाव केला आहे.

6-ब] हे की, मा.तहसिल कार्यालय, गंगाखेड हे भुमि संपादान प्रक्रिया राबविण्याच्या प्रयत्नात असून सदर प्रकरणात उपविभागीय अधिकारी, गंगाखेड तसेच तहसिलदार, गंगाखेड यांनी कुठलीही भुमिसंपादन कार्यवाही न करता तसेच वादीस किंवा वादीच्या वडिलांना जमीन मोबदला संपुर्ण भुमि संपादन प्रक्रिया झाल्याशिवाय वादीच्या मालकी व ताब्यात हस्तक्षेप करणे पुर्णपणे गैरकायदेशीर असून याबाबत प्रतिवादींनी वादी किंवा वादीच्या वडिलांना कुठलाही मोबदला दिला नाही.

तसेच वादग्रस्त मालमत्ता सर्वे नंबर 255/1 याबाबत कुठलीही भुमि संपादन प्रक्रिया केलेली नसून जोपर्यंत कायदेशीर भुमी संपादन प्रक्रिया द्वारे भुमी संपादन करुन वादग्रस्त मालमत्ता याबाबत कुठलाही मोबदला अदा केलेला नसल्यामुळे वादीस वादग्रस्त मालमत्तेमधून बेदखल करण्याचा प्रयत्न गैरकायदेशीर आहे.

4] हे की, वरिल दुरुस्ती वादपत्रामध्ये समाविष्ट करण्यात यावी.

**तरी विनंती की,**

वादीचा अर्ज मान्य करुन अर्जामध्ये नमुद प्रमाणे दुरुस्ती वादपत्रामध्ये समाविष्ट करण्यात यावी.

दिनांक : 20/4/26

वादी

Adv. Kuldeep A. Tengse
B.A.LL.M
Enroll No. Mah. / 3975 / 0f
...cture Colony, Gangakhed
Dist. Parbhani

**अंगद पिता नामदेव दणदने**
रा.आनंदवाडी ता.गंगाखेड जि.परभणी

**सत्यापन**

सत्यापित करण्यात येते की, उपरोक्त अर्जातील मजकूर हा माझ्या माहिती व ज्ञानाप्रमाणे सत्य व बरोबर आहे करिता आज रोजी गंगाखेड येथे सत्यापित करण्यात येत आहे.

दिनांक : 20/4/26

वादी

Adv. Kuldeep A. Tengse
B.A.LL.M
Enroll No. Mah. / 3975 / 0f
...cture Colony, Gangakhed
Dist. Parbhani

**अंगद पिता नामदेव दणदने**
रा.आनंदवाडी ता.गंगाखेड जि.परभणी

# विद्यमान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर गंगाखेड यांचे न्यायालयात

दिवाणी दावा क्रमांक 318/2025

अंगद

**विरुध्द**

तहसिलदार व इतर

वाद : जाहिर करणे व मनाई हुकुम.

**शपथपत्र**

मी, अंगद पित नामदेव दणदने, वय : 51 वर्षे, धंदा : शेती, रा.आनंदवाडी ता.गंगाखेड जि.परभणी शपथपुर्वक निवेदन सादर करतो की,

हे की, निवेदकाने प्रस्तुत दाव्यामध्ये बदल करण्याकरिता दुरुस्ती अर्ज मा.न्यायालयासमक्ष सादर केलेला आहे.

हे की, निबेदकाने सादर केलेल्या अर्जातील मजकूर हा या शपथपत्राचा भाग समजण्यात यावा.

हे की, निवेदकाने सादर केलेल्या अर्जातील मजकूर हा सत्य व बरोबर आहे.

Superintendent C.J.S.D.Court, Gangakhed

करिता हे शपथपत्र.

दिनांक :

निवेदक

अंगद पिता नामदेव दणदने

रा.आनंदवाडी ता.गंगाखेड जि.परभणी

## सत्यापन

सत्यापित करण्यात येते की, उपरोक्त शपथपत्रातील मजकूर हा माझ्या माहिती व ज्ञानाप्रमाणे सत्य व बरोबर आहे करिता आज रोजी गंगाखेड येथे सत्यापित करण्यात येत आहे.

दिनांक :

निवेदक

**अंगद पिता नामदेव दणदने**
रा.आनंदवाडी ता.गंगाखेड जि.परभणी

**AFFIDAVIT**

Solemnly affirmed before me
by Angad Namdev Dandane
Age 51 years occu Agri R/o Anandwadi Tq Gangakhed
Who is identified before me
by Adv K.A. Tengse

whom I know personally

21/01/2024

Adv. K.A. Tengse.